Exh. 1

**अहमदनगर येथिल मे. चिफ ज्युडीशियल मॅजिस्ट्रेट साहेब**

**यांचे कोर्टात**

एस.सी.सी.नंबर

/२०२४

SCC 9569/2024

फिर्यादी

श्री रेणुकामाता मल्टीस्टेट को - ऑप.
अर्बन क्रेडीट सोसायटी लि.,
अहमदनगर, मुख्य शाखा,रेणुका भवन
पाईपलाईन रोड, अहमदनगर तर्फे व
करीता
श्री. धीरज नितीन आव्हाड
वय – २४ वर्षे, धंदा - नोकरी
रा. रेणुका भवन, एकविरा चौक,
पाईपलाईन रोड, सावेडी, अहमदनगर.
मो.नं. – ७८८७३०४२४३

आरोपी

श्री. सचिन शिवलिंगअप्पा कापसे
वय – ३५ वर्षे, धंदा – कापड दुकान
रा.मु.पो. मेन रोड, गेवराई, ता. गेवराई
जि. बीड, ४३११२७
मो.नं. – ७४९९४१६७०३

फिर्यादी-निगोशिएबल इन्स्टुमेंट ॲक्टचे कलम १३८ प्रमाणे

या कामी फिर्यादी कळवितात ते खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) | चेक देणाऱ्याचे नाव | श्री. सचिन शिवलिंगअप्पा कापसे |

| | | |
|---|---|---|
| २) | आरोपीच्या चेकची बँक | भारतीय स्टेट बँक, शाखा- गेवराई, महेश कॉलनी, एन आर, एल. आय. सी. ऑफिस गेवराई, ता. गेवराई, जि. बीड |
| ३) | चेक नंबर,तारीख व रक्कम | चेक नंबर – ३५४५२२<br>ता. – ०५/०८/२०२४<br>रक्कम रुपये- ५०,७१८/- |
| ४) | फिर्यादीची बँक | एच.डी.एफ.सी बँक लि., शाखा - गुलमोहर रोड, सावेडी, अहमदनगर |
| ५) | चेक न वटता परत आल्याची तारीख | ०६/०८/२०२४ |
| ६) | चेक न वटल्याचे कारण | "फंड्स इनसफिशीएन्ट" |
| ७) | फिर्यादीने आरोपीस नोटीस दिलेची तारीख | १९/०८/२०२४ |
| ८) | आरोपीस नोटीस / इंटिमेशन मिळाल्याची तारीख | २२/०८/२०२४ |
| ९) | पोलीस स्टेशनची हद्द | तोफखाना |
| १०) | गुन्हा घडल्याचे कारण व दिंनाक | चेक न वटता परत आल्याबद्दलची नोटीस आरोपीस दि. २२/०८/२०२४ रोजी मिळूनही फिर्यादीची रक्कम मुदतीत आणून दिली नाही. |

१) फिर्यादी संस्था श्री रेणुकामाता मल्टीस्टेट को-ऑप अर्बन क्रेडीट सोसायटी लि., अहमदनगर मुख्य शाखा पाईप लाईन रोड, अहमदनगर हि मल्टीस्टेट सोसायटी ॲक्ट २००२ अन्वये नोदणीकृत झालेली संस्था असून फिर्यादी संस्थेच्या कारभार हा मल्टीस्टेट सोसायटी ॲक्ट प्रमाणे व संस्थेच्या पोट नियमानुसार चालतो. फिर्यादी संस्था ठेवी स्वीकारणे, सभासदांना उद्योगधंद्यासाठी, घरगुती कारणासाठी, सोनेतारण व इतर कारणासाठी कर्ज

पुरवठा करते. फिर्यादी संस्थेचे मुख्य कार्यालय पाईपलाईन रोड सावेडी अहमदनगर येथे आहे.

२) आरोपी हे फिर्यादी संस्थेचे नाममात्र सभासद आहेत. आरोपी यांनी फिर्यादी संस्थेकडून वैयक्तिक कारणासाठी कर्जाची आवश्यकता असल्याने रितसर कर्ज अर्ज करून कर्जाची मागणी केली. आरोपी यांचे कर्ज अर्जाचा फिर्यादी संस्थेच्या संचालक मंडळाने विचार करून आरोपी यांना रक्कम रुपये ३०,०००/- चे कर्ज मंजूर केले व सदरील कर्ज रक्कम आरोपीस अदा करण्यात आली आहे. आरोपी यांनी सदरचे कर्ज घेतलेवेळी फिर्यादी संस्थेस कर्ज अर्ज, प्रॉमिसरी नोट, कर्ज रोखा इत्यादी कागदपत्रे लिहुन व सही करून दिलेली आहेत. सदर कर्ज घेतेवेळी आरोपी यांनी सदर कर्ज व्याजासह फेडण्याची जबाबदारी वैयक्तिक व संयुक्तपणे घेतलेली होती व आहे. आरोपी यांनी सदरील कर्जाचे हप्ते वेळेवर न भरल्याने त्यांचे कर्ज थकबाकी झाले. आरोपीस फिर्यादी संस्थेने वेळोवेळी समक्ष भेटून व तोंडी सांगुन कर्ज हप्त्याची थकबाकीची रक्कम भरण्यात सांगितले असता आरोपी यांनी कर्ज थकबाकीची रक्कम भरली नाही व आरोपी यांनी कर्ज हप्त्याची थकबाकी रक्कम भरण्यास टाळाटाळ केली. परंतु आरोपीला वारंवार थकीत कर्ज रक्कम भरण्याचा तगादा केल्यानंतर शेवटी आरोपीने फिर्यादी संस्थेच्या कार्यलयात येऊन आरोपीचे खाते असलेल्या भारतीय स्टेट बँक, शाखा- गेवराई, महेश कॉलनी, एन आर, एल. आय. सी. ऑफिस गेवराई, ता. गेवराई, जि. बीड या बँकेचा रक्कम रु. ५०,७१८/- चा दि. ०५/०८/२०२४ चेक नं.३५४५२२ हा चेक कर्ज हप्त्याच्या थकबाकीपोटी दिला. तसेच सदरील चेक निश्चित वटेल अशी हमी व भरवसा फिर्यादी संस्थेस दिल्यावरून फिर्यादी संस्थेने त्यांचे खाते असलेल्या एच.डी.एफ.सी बँक लि., शाखा - गुलमोहर रोड, सावेडी, अहमदनगर येथे वटविण्याकरिता भरला असता सदरचा चेक दि. ०६/०८/२०२४ रोजी "फंड्स इनसफिशीएन्ट" असा शेरा मारून मेमोसह न वटता परत आला.

३) आरोपीने फिर्यादीस दिलेला चेक न वटता परत आल्यानंतर फिर्यादी संस्थेने आरोपीस वकीलामार्फत रितसर शेवटच्या ज्ञात असलेल्या पत्त्यावर दिनांक १९/०८/२०२४

रोजी रजि.ए.डी ने नोटीस पाठवून वरील न वटलेल्या चेकच्या रकमेची मागणी केली परंतु सदर नोटीस आरोपीस दिनांक २२/०८/२०२४ रोजी मिळूनही आरोपीने सदरील न वटलेल्या चेकची रक्कम अदा केली नाही व अशा प्रकारे आरोपीने न वटणारा चेक देवुन फिर्यादीची घोर फसवणूक केली आहे. आरोपीचे सदरचे कृत्य हे गुन्हेगारी स्वरूपाचे असून त्या योगे आरोपी यांनी निगोशिऐबल इन्स्टुमेंट अॅक्टचे कलम १३८ अन्वये गंभीर स्वरूपाचा गुन्हा केलेला आहे.

तरी मे. कोर्टास नम्र विनंती की,

सदरील गुन्ह्याची चौकशी करण्यात येवून आरोपीस कायद्या प्रमाणे जास्तीत जास्त शिक्षा व दंड करण्यात यावा व फिर्यादीस दंडाच्या रक्कमेतून चेकची रक्कम मिळावी हि नम्र विनंती.

दिनांक -: 05/10/२०२४

अहमदनगर

फिर्यादी

फिर्यादी तर्फे तूर्त साक्षी पुरावा खालील प्रमाणे –:

१) भारतीय स्टेट बँक, शाखा- गेवराई, महेश कॉलनी, एन आर, एल. आय. सी. ऑफिस गेवराई, ता. गेवराई, जि. बीड

२) मा. शाखाधिकारी, एच.डी.एफ.सी बँक लि., शाखा - गुलमोहर रोड, सावेडी, अहमदनगर चे माहितीगार इसम साक्षीस येतांना आरोपीने फिर्यादीस दिलेला चेक क्रं. ३५४५२२ दिनांक – ०५/०८/२०२४ रोजीचा न वटता परत आल्याबाबतची सर्व अस्सल कागदपत्रे व खाते उतारा घेवुन साक्षीस यावे.

अहमदनगर

फिर्यादी

Exh. 5

अहमदनगर येथिल मे. चिफ ज्युडीशियल मॅजिस्ट्रेट साहेब
यांचे कोर्टात

**एस.सी.सी.नंबर**

/२०२४

Scc 9569/2024

**फिर्यादी**

श्री. रेणुकामाता मल्टीस्टेट को - ऑप.

**आरोपी**

श्री. सचिन शिवलिंगअप्पा कापसे

___0___
Read and Recorded

IRSHAD MOHMADRAFIK NAIKWADI
Digitally signed by IRSHAD MOHMADRAFIK NAIKWADI
Date: 2025.01.22 10:35:51 +0530

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

**अॅफेडेव्हीट**

**याकामी फिर्यादीतर्फे पुराव्याकामी सरतपासणीचे अॅफिडेव्हीट पुढीलप्रमाणे -:**

मी श्री. धीरज नितीन आव्हाड वय – २४ वर्षे, धंदा – नोकरी, रा. रेणुकाभवन, पाईपलाईन रोड, सावेडी, अहमदनगर सत्य प्रतीज्ञेवर कथन करतो कि,

१) फिर्यादी संस्था श्री रेणुकामाता मल्टीस्टेट को-ऑप. अर्बन क्रेडीट सोसायटी लि., अहमदनगर हि मल्टीस्टेट सोसायटी अॅक्ट २००२ अन्वये नोदणीकृत झालेली संस्था असून फिर्यादी संस्थेच्या कारभार हा मल्टीस्टेट सोसायटी अॅक्ट प्रमाणे व संस्थेच्या पोट नियमानुसार चालतो. फिर्यादी संस्था ठेवी स्वीकारणे,सभासदांना वैयक्तिक, व्यवसायसाठी व इतर कारणासाठी कर्ज पुरवठा करते. मला संस्थेच्या थकीत कर्जदारांविरुद्ध कोर्ट कार्यवाही करण्याचे तसेच निगोशिऐबल इन्स्टुमेंट अॅक्ट अन्वये संस्थेच्या वतीने कार्यवाही करण्याचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून फिर्यादी संस्थेने मला अधिकार दिलेले आहेत. सदर अधिकार दिल्याचा ठरावाची प्रत मी आज रोजी मे कोर्टात दाखल करीत आहे. त्यातील मजकूर मूळ प्रोसेडींग बुक प्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास मी निशाणी देऊन पुराव्याकामी वाचण्यात यावे.

Assistant Superintendent
Chief Court, Ahmednagar

२)    मी आरोपी यांना ओळखत असून ते फिर्यादी संस्थेचे सभासद आहेत. आरोपी यांनी फिर्यादी संस्थेकडून वैयक्तिक कारणासाठी कर्ज मिळावे म्हणून फिर्यादी संस्थेकडे रितसर कर्ज प्रकरण करून कर्जाची मागणी केली. आरोपी यांचे कर्ज अर्जाचा फिर्यादी संस्थेच्या संचालक मंडळाने विचार करून आरोपी यांना रक्कम रुपये ३०,०००/- चे कर्ज मंजूर केले व सदरील कर्ज रक्कम आरोपी यांना अदा करण्यात आली आहे. आरोपी यांनी सदरचे कर्ज घेतलेवेळी फिर्यादी संस्थेस कर्ज अर्ज, प्रॉमिसरी नोट, कर्ज रोखा व जामीन रोखा इत्यादी कागदपत्रे लिहुन व सही करून दिलेली आहेत. सदर कर्ज मागणी अर्ज, त्यावर कर्जदार, जामीनदार, मॅनेजर/चेअरमन यांच्या सह्या आहेत. त्या मी ओळखतो. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून इ. में कोर्टात दाखल करीत आहे. सदर कर्ज घेतेवेळी आरोपी यांनी सदर कर्ज व्याजासह फेडण्याची जबाबदारी वैयक्तिक व संयुक्तपणे घेतलेली होती व आहे. आरोपी यांनी सदरील कर्जाचे हप्ते वेळेवर न भरल्याने त्यांचे कर्ज थकबाकी झाले म्हणून आरोपीस आमचे अशिल संस्थेने वेळोवेळी समक्ष भेटून व तोंडी सांगुन कर्ज हप्त्याची थकबाकीची रक्कम भरण्यात सांगितले असता आरोपी यांनी कर्ज थकबाकीची रक्कम भरली नाही व आरोपी यांनी कर्ज हप्त्याची थकबाकी रक्कम भरण्यास टाळाटाळ केली. परंतु आरोपीला वारंवार थकीत कर्ज हप्ते भरण्याचा तगादा केल्यानंतर शेवटी आरोपीने फिर्यादी संस्थेच्या कार्यलयात येऊन आरोपीचे खाते असलेल्या भारतीय स्टेट बँक, शाखा- गेवराई, महेश कॉलनी, एन आर, एल. आय. सी. ऑफिस गेवराई, ता. गेवराई, जि. बीड या बँकेचा रक्कम रु.५०,७१८/- चा दि. ०५/०८/२०२४ चा चेक नं. ३५४५२२ हा चेक थकीत कर्ज हप्त्या पोटी दिला. सदरचा चेक वर्णन यादी सोबत दाखल केलेला आहे. त्यावर आरोपीची सही असून ती खरी व बरोबर आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून तो मी ओळखतो त्यास निशाणी देण्यात यावी. पुराव्याकामी वाचण्यात यावी. सदरील चेक देतेवेळी तो निश्चित वाटेल अशी हमी व भरवसा फिर्यादी संस्थेस दिल्यावरून फिर्यादी संस्थेने त्यांचे खाते असलेल्या एच.डी.एफ.सी बँक लि., शाखा - गुलमोहर रोड, सावेडी, अहमदनगर येथे वटविण्यासाठी भरला असता सदरचा चेक "फंड्स इनसफिशीएन्ट" असा शेरा मारून दिनांक०६/०८/२०२४

Assistant Superintendent
Chief Court, Ahmednagar

रोजीची बँक मेमो सह न वटता परत आला. फिर्यादी संस्थेच्या बँकेने चेक सोबत आलेला मेमो वर्णनयादी सोबत दाखल केले आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून तो मी ओळखतो त्यास निशाणी देण्यात यावी.

३) आरोपीने फिर्यादीस दिलेला चेक न वटता परत आल्यानंतर फिर्यादी संस्थेने आरोपीस अॅड. धनलक्ष्मी एस. नायडू यांच्यामार्फत रितसर शेवटच्या ज्ञात असलेल्या पत्त्यावर दिनांक १९/०८/२०२४ रोजी रजि.ए.डी ने नोटीस पाठवून वरील न वटलेल्या चेकच्या रकमेची मागणी केली परंतु सदर नोटीस आरोपीस दिनांक २२/०८/२०२४ रोजी मिळूनही आरोपीने सदरील न वटलेल्या चेकची रक्कम मुदतीत आणून दिली नाही. नोटिशीची स्थळ प्रत R.L रिसीट सह वर्णन यादी सोबत दाखल केलेली आहे त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर अॅड. धनलक्ष्मी एस. नायडू यांची सही आहे, ती मी ओळखतो. त्यास निशाणी देण्यात यावी. आरोपीस नोटीस मिळाल्याबाबत ची पोस्टाची ऑनलाईन प्रत/परत आलेले पाकीट, वर्णन यादी, खाते उतारा, 63 B, सोबत दाखल केला आहे. त्यास निशाणी देऊन पुराव्याकामी वाचण्यात यावी. व सदर अधिकार दिल्याचा ठरावाची प्रत, मी आज रोजी में कोर्टात दाखल करीत आहे. त्यातील मजकूर मूळ प्रोसेडींग बुक प्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास मी निशाणी देऊन पुराव्याकामी वाचण्यात यावे. अशा प्रकारे आरोपीने निगोशिऐबल इन्स्ट्रुमेंट अॅक्टचे कलम १३८ चे तरतुदीनुसार मुदतीत म्हणजेच १५ दिवसात चेकची रक्कम आणून दिलेली नाही. आरोपीने जाणूनबुजून खात्यात पुरेशी रक्कम शिल्लक नसतांना फिर्यादी संस्थेस चेक देऊन संस्थेची फसवणूक केलेली आहे. आरोपीचे सदरचे कृत्ये हे गुन्हेगारी स्वरूपाचे असून त्या योगे आरोपी यांनी निगोशिऐबल इन्स्ट्रुमेंट अॅक्टचे कलम १३८ अन्वये गंभीर स्वरूपाचा गुन्हा केलेला आहे.

सदरील गुन्ह्याची चैकशी करण्यात येवून आरोपीस कायद्याप्रमाणे जास्तीत जास्त शिक्षा व दंड करण्यात यावा व फिर्यादीस दंडाच्या रक्कमेतून चेकची रक्कम मिळावी हि नम्र विनंती.

Assistant Superintendent
Chief Court, Ahmednagar

वरील सर्व मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर असून त्याचे सत्यतेसाठी आज रोजी सदर ॲफेडेव्हीट करून दिले असे.

दिनांक -: ५ /१०/२०२४

अहमदनगर

ओळख

ॲफेडेव्हीट करणारा

Solemnly affirmed before me namely
by Dhiraj Nitin Avhad age 25 occ. service
Who is identified before me
by ADV. D.S. Naidu R/o, Pipeline Road, Savedi, A. Nagar
or whom I Personally know.
Dt. 5 / 10 /2025

Assistant Superintendent 5.10.25
Chief Court, Ahmednagar